# सोशल ऑडिट म्हणजे काय?

**सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या योजना लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचल्या की नाही, याची पडताळणी लोकांच्या सहभागाने करणे म्हणजे ‘सोशल ऑडिट’ होय.**



# सोशल ऑडिट प्रक्रियेचे टप्पे

गट बांधणी

## गावांमध्ये सोशल ऑडिट करण्यासाठी **गट बांधणी** करणे.

- या गटात शक्यतो सरकारचे प्रतिनिधी आणि योजनांच्या निधीशी संबंधित सह्या करणारे गावातील प्रतिनिधी नसावेत.
- हा गट कमीत कमी ८ ते १० जणांचा असावा.
- या गटात महिला, पुरुष, तरुण मुल-मुली व ज्यांना अशा कामाची आवड आहे असेच लोक असावेत.



प्रशिक्षण

# गटाचे ‘सोशल ऑडिट प्रक्रिया’ कशी करायची आहे? याबाबत प्रशिक्षण घेणे.

- प्रशिक्षणामध्ये ज्या योजनांचे सोशल ऑडिट करायचे आहे, त्या योजनांची माहिती देणे.
- शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून गावगटाला जी माहिती घ्यायची आहे, त्या माहितीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे असेल? त्याचे फॉरमॅट समजावून सांगणे.
- निवडलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष सोशल ऑडिट घडवून आणण्यासाठीचे नियोजन करणे.



# निवडलेल्या योजनांची जाणीव जागृती लोकांमध्ये करणे.

- आपण सोशल ऑडिटसाठी ज्या योजना निवडल्या आहेत, त्या योजनांची गावात बैठका घेऊन व इतर माध्यमातून जाणीव जागृती करणे.



# सरकारकडून योजनांची माहिती मिळवणे

- सोशल ऑडिटसाठी निवडलेल्या योजनांची माहिती सरकारी अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून घेणे.

- या माहितीत लाभार्थ्यांची यादी, त्या संबंधित बजेट इत्यादी गोष्टींची माहिती झेरॉक्स करून घेणे किंवा फॉरमॅटमध्ये लिहून घेणे.






- सरकारकडून लिहून घेतलेल्या माहितीवर माहिती देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची सही घेणे आवश्यक आहे.

# प्रत्यक्ष लाभार्थी भेट आणि माहितीची पडताळणी

- लाभार्थ्यांना भेटून सरकारकडून मिळालेल्या माहितीची तपासणी करणे व पाहणी करणे.

- सोशल ऑडिट करणाऱ्या गटाने सरकारकडून मिळालेली माहिती आणि लाभार्थ्यांकडून मिळालेली माहिती याची पडताळणी करून त्यात काही तफावत असेल तर ते मुद्दे नोंद करणे.

- त्याबाबत लाभार्थ्यांची तक्रार असेल तर ती त्यांच्याकडून लिहून घेणे.

(सामाजिक अंकेक्षण करणारा गट शक्यतो दुसऱ्या गावात जाऊन सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया पूर्ण करेल. या संपूर्ण प्रक्रियेत काम करणारी व्यक्ती तटस्थ असणे आवश्यक आहे.)



जनसुनवाई

# आपले म्हणणे मांडण्याची हक्काची जागा - जनसुनवाई

- पडताळणीतून पुढे आलेले मुद्दे सोडवण्यासाठी सोशल ऑडिट करणाऱ्या गटाने गावात जनसुनवाई आयोजित करणे.

- जनसुनवाईत सर्व ग्रामस्थ, ग्राम पंचायत पदाधिकारी, संबंधित योजनांचे अधिकारी-कर्मचारी, पडताळणी प्रक्रियेतील सेवा न मिळालेल्या व्यक्ती उपस्थित असणे अपेक्षित आहे.

- यावेळी प्रत्यक्ष सेवा न मिळालल्या व्यक्तींनी पुढे येऊन आपल्या तक्रारी मांडणे अपेक्षित आहे.

- उपस्थित तक्रारींवर संबंधित यंत्रणेने उत्तरे देऊन या तक्रारीचे ठरलेल्या कालावधीत निवारण करणे अपेक्षित आहे.



पाठपुरावा

# जनसुनवाईमध्ये झालेल्या निर्णयांचा **पाठपुरावा** करणे.

- जनसुनवाईमध्ये झालेल्या निर्णयांची ठरावीक कालावधीत अंमलबजावणी होण्यासाठी गावगटातील सदस्यांनी पाठपुरावा करणे.
- जे मुद्दे जनसुनवाईमध्ये सुटले नव्हते ते मुद्दे पाठपुराव्यातून सोडवणे अपेक्षित आहे.

